
Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

# AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi




Ajanta Prakashan

Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | धम्मचक्र प्रवर्तन दिन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. अशोक सोनकांबळे** | १-३ |
| २ | धम्मचर्क प्रवर्तन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रा. डॉ. माया बापूराव मसराम** | ४-६ |
| ३ | डॉ. बाबसाहेब आंबेडकरांच्या विचारातील धम्म विज्ञान<br>**प्रा. डॉ. नरसिंग पिराजी कुडकेकर** | ७-११ |
| ४ | खाउजा धोरण आणि भारतीय स्वातंत्र्य<br>**प्रा. डॉ. जया सवाईथूल** | १२-२० |
| ५ | दीक्षाभूमी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. जे. एम. काकडे** | २१-२३ |
| ६ | स्त्री सशक्तीकरण आणि कामगार कल्याणात डॉ. आंबेडकरांची भूमिका<br>**प्रा. विजय मालेकर** | २४-२६ |
| ७ | बौद्धधम्म प्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**लोखंडे चारुशिला उत्तम शशिकला** | २७-३१ |
| ८ | स्त्री सक्षमिकरण आणि फुले दाम्पत्य<br>**प्रा. डॉ. संतोष संभाजी डाखरे** | ३२-३४ |
| ९ | धम्मचक्र प्रवर्तन दिन आणि सम्राट अशोक<br>**डॉ. अमोल र. बोरकर** | ३५-३७ |
| १० | गौतम बुद्धांचे पर्यावरण विषयक विचार<br>**प्रा. कांबळे दयानंद सखाराम** | ३८-४२ |
| ११ | समग्र मानवी कल्याणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नैतिक तत्त्वज्ञानाची आवश्यकता<br>**प्रा. अजय शिंगाडे** | ४३-४७ |
| १२ | बौद्ध धम्माने केली मानवी मुल्यांची जोपासण<br>**प्रा. डॉ. गजानन जी. हिवराळे** | ४८-५२ |
| १३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मांतराची भूमिका<br>**प्रा. डॉ. सुनिल शिवमूर्ती रजपूत** | ५३-५५ |



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)

# १३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मांतराची भूमिका

प्रा. डॉ. सुनिल शिवमूर्ती रजपूत
सहाय्यक प्राध्यापक, जवाहर महाविद्यालय, अणदूर.

**प्रस्तावना**

बौध्द बांधवांना ख-या अर्थाने माणूस म्हणून जगायचा अधिकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतर करून मिळवून दिला. त्यांच्या " भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म " या अद्वितीय ग्रंथात तथागतांची जीवनगाथा आणि शिकवण आलेली आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधूता आणि प्रेम शिकवणा-या बुध्द धम्माची स्थापना तथागत भगवान बुध्दांनी केली. अशा या महान धम्माचे यथार्थ दर्शन अखिल भारत वासियांना सम्राट अशोकानंतर महामानव, प्रज्ञासूर्य , स्वतंत्र भारताचे शिल्पकार भारतरत्न परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 14 आक्टोबर 1956 रोजी नागपूर या ठिकाणी धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधून आपण सर्वांना करून दिले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असणारा धम्म म्हणजे बौध्द धम्म होय. बौध्द धम्माशिवाय जगात कोणत्याही धर्माला धम्म म्हटले जात नाही. इतर सगळयांना धर्म म्हटले जाते. म्हणून बाबासाहेबांनी धम्माचे वेगळेपण स्पष्ट करताना धर्म आणि धम्म यात स्पष्टपणे फरक दाखविला. वैयक्तिक आणि सामाजिक निती म्हणजे धम्म अशी ते धम्माची व्याख्या करतात. धम्मात समता, स्वातंत्र्य, बंधुत्व अणि सामाजिक न्याय आहे. कोणताही धर्म किंवा धर्मप्रेषित हा मोक्षदाता होऊ शकत नाही. तो मार्गदाता होऊ शकतो. धम्म म्हणजे जीवनमार्ग तर धर्म म्हणजे जीवनवृत्ती, प्रवृत्ती. जीवन मार्गात नितीमत्तेला महत्व असते. धम्म हा समाजसापेक्ष असतो. तर धर्म हा व्यक्तिसापेक्ष असतो. धम्मात व्यक्तिगणिक बदल संभवातात. ही व्यक्ति सापेक्षता एकसंघ व सार्वजनिक नसते. बौध्द धम्मातील तत्वे ही सार्वत्रिक असतात.

**शोध निबंधाचा उद्देश**

1) धर्माचे स्वरूप समाजावून सांगणे

2) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितल्याप्रमाणे धर्म हे व्यक्ति, विकासाचे साधन होते काय ? हे पाहणे.

3) अस्पृश्यता ही असमानता आहे, धर्मांतराने यात काय बदल झाले ? हे तपासणे.

**संशोधन साधने**

संशोधन साधनात विविध ग्रंथ, पुस्तके, मासिके, वृत्तपत्रातील कात्रणे, चर्चा, चर्चासत्रे यातील विषया संदर्भातील साहित्य इ. चा वापर केला आहे.

**संशोधन पध्दती**

संशोधन पध्दतीत विषयाच्या गरजेनुसार वर्णनात्मक, तुलनात्मक , विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब केलेला आहे.



Principal
Jawahar Arts. Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मांतराबाबत विचार**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराच्या निर्णयाचा अभ्यास करताना सर्वप्रथम आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, त्यांनी धर्मांतर अचानकपणे व घाईघाईने केलेले नाही. धर्मांतराची घोषणा 13 आक्टोबर 1935 रोजी केली. पण धर्मांतर 14 आक्टोबर 1956 रोजी केले. म्हणजे जवळजवळ 21 वर्षे बाबासाहेब धर्मांतराची घोषणा करून प्रत्यक्षात धर्मांतर करण्यासाठी थांबलेले दिसतात. या मध्यंतरीच्या काळात त्यांनी धर्मांतरासंबंधीचा सविस्तर व सखोल अभ्यास केलेला पहावयास मिळतो. म्हणजेच बाबासाहेबांचे धर्मांतर हे सखोल विचाराअंती केलेले धर्मांतर आहे.

नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश करण्यास सनातनी हिंदूंनी केलेला प्रखर विरोध पाहून काही अस्पृश्यांनी इस्लाम धर्माचा स्विकार केला. तसेच काही अस्पृश्यांनी डॉ.आंबेडकरांच्या विनंतीला मान देऊन इस्लाम धर्म स्विकारण्याचा बेत पुढे ढकलला. कोणताही सार्वत्रिक विचार न करता एकट्या दुकट्या कुटुंबाने मनात आले तसे धर्मांतर करणे दलित चळवळीसाठी घातक आहे. हे डॉ.आंबेडकरांच्या नजरेतून सुटले नाही. म्हणूनच अशी एकटी दुकटी धर्मांतरे रोखणे आंबेडकरांना आवश्यक वाटले.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर**

धर्मांतर करीत असताना डॉ.आंबेडकरांनी जगभरातील सर्व धर्मांचा अभ्यास केला. शेवटी प्रचंड विचारांनी त्यांनी बौध्द धर्म स्विकारण्याचा निर्णय घेतला आणि 14 आक्टोबर 1956 रोजी विजयादशमीच्या दिनी बुध्द धम्माचा स्विकार सपत्नीक केला. धम्मचक्र प्रवर्तन करतेवेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मी भारतीय संस्कृतीशी एकनिष्ठ आणि अभिन्न अशा बुध्द धम्माचा स्विकार केला. असे म्हटले आहे.

**धर्मांतर करण्यामागील कारणे**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतराचा निर्णय घेण्यामागे भारतातील हिंदू धर्माची बुरसटलेली वृत्ती आहे. महाड आणि नाशिक येथे केलेल्या अस्पृश्य चळवळीला सवर्णांकडून सहकार्य मिळाले नव्हते. त्यामुळे सवर्णांची हिंदू धर्मातील अस्पृश्य बांधवांकडे पाहण्याची दृष्टी बदललेली नव्हती.

सवर्णांकडून अस्पृश्यांवर होणारा अन्याय वाढलेला होता. ती अन्याय करण्याची कारणे अतिशय क्षुल्लक होती. अस्पृश्यांनी आपल्या जगण्यात थोडा जरी सुधारणावादी बदल केला तरी ते सवर्णांच्या डोक्यात बसत असे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर धर्मांतर करणार म्हणून हिंदू धर्मात खळबळ माजली. धर्मांतर केल्याने एक प्रकारे अस्पृश्यता नष्ट होणार होती. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कौतुक करताना श्री शंकराचार्य (डॉ.कुर्तकोटी ) यांनी मान्य केले होते की, हिंदू धर्मीय अस्पृशांना वाईट वागणूक देत होते. या संदर्भात ते पुढे म्हणतात. " उलट माझे असे मत आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या प्रचंड प्रयत्नांनी आणि कार्यांनी अस्पृश्य समाजाला जागे केले आणि त्यांच्यात स्वाभिमान, दलित जीवनाब÷ल लाज आणि उन्नत जीवनाब÷ल प्रयत्न करण्याची जि÷ निर्माण करून आम्हा हिंदूंना नतमस्तक केलेले आहे. हे त्यांचे आम्हांवर अगणित उपकार आहेत."

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धर्म चिंतन सखोल, व्यापक आणि दूरदृष्टीचे दर्शन घडविते. भगवान बुध्दाच्या विचारसरणी वर त्यांची अटळ श्रध्दा दिसून येते , तशी त्यांची या देशातील दिनदुबळ्या, अज्ञानी, , आर्थिक दरिद्री समाजावरील श्रद्धा, करूणाही त्यांच्या धर्मचिंतनातून प्रतिबिंबित होताना दिसते. डॉ.आंबेडकर बौध्द धम्माच्या माध्यमातून सामाजिक



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

राष्ट्रीय एकात्मता निर्माण करू पाहत होते. सामाजिक समता, बंधूता, न्याय, स्वातंत्र्य आदि मुल्ये ही बौध्द धर्माच्या स्वीकारातून भारतीय समाजजीवनात रूजून राष्ट्राचा उत्कर्ष घडून येईल. असा त्यांना आत्मविश्वास, वाटत होता.

**निष्कर्ष**

1) धर्मांतराने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांना समाजात मानसन्मानाचे जगणे मिळण्यास मदत झाली.

2) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे त्यांचा अनुयायी आपल्या बांधवांवर होणा-या अन्यायाला वाचा फोडून त्याला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करताना दिसतो, एकत्र येताना दिसतो.

3) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्व हे आदर्श मानून त्यांच्या नंतरच्या अनुयायांनी आपल्या मुलांच्या शिक्षणात थक्क करणारी प्रगती साधली याचे प्रत्यंतर दिसून येते.

4) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जन्मदिन ज्ञानदिन म्हणून संपूर्ण जगभर साजरा होताना दिसतो.

5) जगाच्या प्रचंड दबावामुळे आजच्या भारत सरकारला बाबासाहेबांचे विचार मान्य नसतानाही त्यांची जयंती भारतात साजरी करावी लागते. हे बाबासाहेबांचे बौध्द धम्म स्विकारण्याचे परिणाम आहेत असे दिसते.

**समारोप**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर समाज परिवर्तनाच्या चळवळीचे अंग मानले जाते. हिंदू धर्मातील सुधारणा शक्य नाही . म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतराचा निर्णय घेतला. बौध्द धम्मात असहिष्णूता, न्याय, समानता, विज्ञाननिष्ठा, स्वातंत्र्य , बंधूता आणि प्रत्येकाला उत्तर मिळेल याची शाश्वती असल्याने या धम्मातून लोकांचा उध्दार झालेला दिसून आला. बाबासाहेबांचे विचार खूपच प्रेरक आहेत. धर्मांतरानंतर केवळ दोनच महिन्यांचे आयुष्य त्यांना लाभले. यापेक्षा आणखी जास्त काळ त्यांना लाभला असता तर भारत बौध्दमय करण्याचे त्यांचे स्वप्न खरे ठरले असते.

**संदर्भ**

1) सक्षम समीक्षा - संपा.डॉ.शैलेश त्रिभूवन - त्रैमासिक, डिसेंबर 2013.

2) बुध्द आणि त्यांचा धम्म - डॉ.बाबासाहेब आंबेडकर

3) सुरवाडे मनोहर , समकालीन दलित कथाः एक अभ्यास , अन्वय प्रकाशन, विद्यानगर, फैजपूर जि. जळगाव , पहिली आवृत्ती, 14 एप्रिल 2006

4) निरंजन पाटील, आंबेडकरी क्रांतीचे तत्वज्ञान, सम्यक व्हिजन, मुंबई 2014 पृ.क्र.163

5) डॉ.अनिल शिंगारे, डॉ.विठ्ठल घुले, महाराष्ट्रातील आंबेडकर चळवळीचा इतिहास, अरूणा प्रकाशन, 2009, पृ.क्र.136

6) खरात शंकरराव, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर रौप्य महोत्सवी प्रकाशन, पुणे -30, प्रकाशक मालती वी माटे, प्रथम आवृत्ती 15 मे 1990.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.